# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 28.08.2012 रोजी (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-11) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

शुक्रवार दिनांक 28.08.2012 (का.प.क्र.11) रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 12.30 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त तथा उपआयुक्त (प्रशासन), श्री.रविंद्र निकम, प्र.नगर सचिव तथा विधी सहाय्यक श्री.ओ.सी.शिरसाठ यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
02. स. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
03. स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
04. स. श्री.आगा खान मिया खान
05. स. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
06. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
07. स. श्रीमती घडमोडे सविता भगवान
08. स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
09. स. श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
10. स. श्री.बाळुलाल वरदाजी गुजर
11. स. श्री. खान अक्रम करीम खान
12. स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
13. स. श्रीमती निलाबाई देविदास जगताप

**विषय क्र. 44 :**

मा.उच्च न्यायालय मुंबईचे औरंगाबाद खंडपीठाने याचिका क्र.6997/2011दिनांक 10/07/2012 रोजी दिलेल्या निर्णयानुसार श्री.सिताराम शंकर गायकवाड, दुय्यम आवेक्षक (सध्या सेवेतून बडतर्फ) मनपा, औरंगाबाद यांनी कार्यालयीन आदेश क्रमांक मनपा/आस्था-1/2011/1270, दिनांक 06 सप्टेंबर 2011 अन्वये त्यांना महानगरपालिका सेवेतून बडतर्फ केल्याच्या आदेशाविरूध्द स्थायी समितीकडे सादर केलेल्या अपिलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

मा.सभापती :विषय क्रमांक 44 मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे सुनावणी घेत आहेत.

श्री.सिताराम गायकवाड : मला माझ्या दोषारोपाबाबत खुलासा मांडण्यासाठी सभागृहासमोर संधी दिली त्याबद्दल मी आपले ऋणी आहे. नगर भुमापन क्रमांक 20722 भुसंपादन प्रकरणी मोबदला अदाईबाबत अनियमितता झाली अशी चौकशी करून माझ्यावर खालील प्रकारचे आरोप सिध्द झाले असा निष्कर्ष काढुन मा.आयुक्त महोदयांनी दिनांक 06.01.2011 रोजी मनपा सेवेतुन बडतर्फ केलेले आहेत.

**दोषारोप क्रमांक 1 :- श्री जयराम नाथू साळुंखे यांच्याकडून जागेचा ताबा घेत असतांना प्रत्यक्षात मोजमाप न करता जागा ताब्यात घेणे.**
**दोषारोप क्रमांक 2 :- प्रत्यक्षात 46468 चौमी जागा मनपाने संपादित केलेली असतानाही फक्त 259.335 चौमी जागा ताब्यात घेणे.**
**दोषारोप क्रमांक 3 :- श्री गुणवानी यांच्याकडून संपादित करावयाच्या जागेबाबत वाद सुरु आहे हे माहिती असूनही सदरची बाब वरिष्ठांचे निदर्शनास आणून न देणे.**

**मा.महोदय,मी आपल्या निदर्शनास आणु इच्छितो की, श्री जयराम साळुंके व श्री नंदलाल गुणवानी यांनी त्यांच्या मालकी हक्कातील जागा मंजुर विकास योजना आरक्षण क्र.87 व 88 प्राथमिक शाळा व क्रिडांगणासाठी आरक्षणात असल्याने त्यांनी त्यांची जागा संपादन करणेसाठी महाराष्ट्र प्रोदशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 49 अन्वये शासनास सन 1999/2000 मध्ये खरेदी सुचना दिल्या आहेत. सदर खरेदी सुचनेवर तत्कालीन उप संचालक नगर रचना म.न.पा. औरंगाबाद यांचे नगर सचिव महाराष्ट्र शासन विभागाने अर्जदाराचे जागे बाबत मालकी हक्कासह सविस्तर अभिप्राय घेऊन त्यांचे खरेदी सुचना कायम केलेले आहे.**

**मा.महोदय, वरील खरेदी सुचनेनुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन भुसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे मार्फत विशेष भुसंपादन अधिकारी विशेष घटक औरंगाबाद यांचेकडे वर्ग झाले आहे.**

**मा.महोदय, ज्या काही भुसंपादन संस्था आहेत.उदा:- महानगरपालिका,नगर पालिका, सिडको,म्हाडा, सार्वजनिक बांधकाम, पाटबंधारे खाते जिल्हा परिषद हे जमीन संपादन करणेसाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवतात. व मा.जिल्हाधिकारी सदर प्रस्ताव विशेष भुसंपादन अधिकारी, विशेष घटक यांचेकडे पाठवितात. विशेष भुसंपादन अधिकारी, विशेष घटक हे ज्या जमिन संपादन करावयाची आहेत त्या जागेची मालकी हक्क त्याचा जागेचा संयुक्त मोजणी नकाशा इत्यादी नगर भुसंपादन अधिकारी तथा तालुका निरीक्षक भुमि अभिलेख कार्यालयाकडुन घेतात. सदर मोजणी नकाशासह मालकी हक्काबाबतचा अहवाल मागविला जातो व त्यानंतर भुसंपादनाची कार्यवाही केली जाते.**

**मा.महोदय,पुष्पनगरी येथील न.भु.क्र. 20722 बाबत सुध्दा विशेष भुसंपादन अधिकारी, विशेष घटक औरंगाबाद यांनी नगर भुमापन अधिकारी, यांचेकडुन संयुक्त मोजणी नकाशा व मालकी हक्क अहवाल घेतलेला असुन दि. 10/08/2000 रोजी श्री.जयराम साळुंके यांचे 464.68 चौ.मी. साठी तर दि.14/09/2004 रोजी श्री. नंदलाल गुणवाणी व इतर यांचे 3252.17 चौ.मी. साठी संयुक्त मोजणी करुन दिली असुन त्या मोजणी वेळी मी स्वत: हजर होतो. मोजणी नकाशावर नगर भुमापन अधिकारी, त्यांचे सर्व्हेअर व माझी स्वाक्षरी आहे.**

**मा.महोदय, सदर संयुक्त मोजणी वेळी श्री. जयराम नाथु साळुंके यांचे 464.68 चौ.मी. जागेस दोन बाजुस तारेचे कुम्पण होते. तर दोन बाजु खुल्या होत्या. हे संयुक्त मोजणी नकाशावरुन स्पष्ट लक्षात येईल (कृपया A वर अवलोकन केले आहे)**

**मा. महोदय, या भुसंपादीत प्रकरणांत विशेष भुसंपादन अधिकारी विशेष घटक यांनी सुध्दा जागेची पाहणी व मोजणी करुन रितसर निवाडा जाहिर करुन व संबंधीत मिळकत धारकास मोबदला देवुन त्यांच्याकडुन ताबा घेतलेला आहे.नगर भुमापन कार्यालयाचे संयुक्त मोजणीनुसार मोजणी केली असता 464.68 चौ.मी. क्षेत्र होते. जे कि त्याबाबतचे वि.भु.स. अधिकारी यांचे ताबा पावती वरुन निदर्शनास येईल. (कृपया B वर अवलोकन व्हावे) ते सोबत जोडले आहे.**

**मा.महोदय,दिनांक 21/04/2001 रोजी ताबा घेत वेळी सदर 464.68 चौ.मी.जागेस दोन बाजुस तार फेन्सींग होते तर दोन बाजु खुल्या होत्या, आज म्हणजे 9-10 वर्षांनी त्या जागेची हद्द / तार फेन्सींग, कोणी मागे पुढे सरकवले असतील तर मला कसे काय दोषी धरता येईल. मी तर त्यावेळी नगर भुमापन कार्यालयाच्या मोजणी नकाशा प्रमाणे जागा ताब्यात घेतली आहे. त्यावेळी 464.68 चौ.मी. होते. व तसा वि.भु.सं.अधिकारी यांचेकडुन प्रत्यक्ष ताबा घेतल्याचे ताबा पावती आहे. त्यामुळे 464.68 चौ.मी. ऐवजी 259.33 चौ.मी. ताबा घेण्यात आला असे कसे म्हणता येईल. यावरुन मोज माप न करता जागा ताब्यात घेणे व 464.68 चौ.मी. ऐवजी फक्त 259.33 चौ.मी. जागेचा ताबा घेतला हा दोषारोप किती बिनबुडाचा व मोघम स्वरुपाचा व कोणताही ठोस पुरावा चौकशी अधिकारी यांनी जोडलेले दिसत नाही.**

**मा.महोदय, मी आपल्या निदर्शनास आणु इच्छितो की, ह्याच 464.68 चौ.मी. क्षेत्र भुसंपादन प्रकरणी मा.चौकशी अधिकारी तथा मुख्य लेखापरिक्षक यांनी फेर चौकशी करुन 464.68 चौ.मी. क्षेत्र संपादन प्रकरणी श्री.जयराम नाथु साळुंके यांचेकडुन कोणतेही फसवणुक झ ााल्याचे निष्पन्न होत नाही. त्यामुळे श्री. जयराम साळुंके, विशेष भुसंपादन अधिकारी, व जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद यांचेवर कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही. असा स्पष्ट चौकशी अहवाल सादर केला आहे ( C वर --- ) सोबत जोडलेला आहे. त्यामुळे मी मोजणी केली नाही किंवा मोजणी करुन ताबा घेतला नाही असे स्पष्ट नमुद होत नाही.**

**मा.महोदय, मी आपणांस निदर्शनास आणु इच्छितो की, दोषारोप क्र.3 श्री.गुणवाणी व इतर त्यांचे 3252.17 चौ.मी. विशेष भुसंपादन अधिकारी, विशेष घटक यांनी नगर भुमापन अधिकारी औरंगाबाद यांचेकडुन संयुक्त मोजणी व मालकी हक्काचा अहवाल घेवुन भुसंपादनाच्या कार्यवाहीसाठी 2/3 रक्कम 90 लाख मागणी केली होती. ती रक्कम उक्तक कार्यालया मागणी केलेचे वरिष्ठांकडे सादर केले होते. तथापि, त्यावेळी, तात्कालीन मा.मुख्यलेखाधिकारी तथा मुख्य लेखापरिक्षक श्री.खैरनार साहेब व तत्कालीन सहाय्यक संचालक नगर रचना म.न.पा. औरंगाबाद श्री.राठोउ साहेब यांनी चर्चा करुन भुसंपादन प्रकरणांत 12 टक्के अतिरिक्त मोबदला व 30 टक्के दिलासा रक्कम असे जास्तीची रक्कम द्यावी लागत असल्याने खाजगी वाटा घाटीने संपादन करणे बाबत आदेशित केले. संचिकेत परि.क्र.90 व 96 (कृपयाD वर अवलोकन व्हावे) सोबत जोडलेले आहे.**

**याबाबत मा.आयुक्तांनी विशेष भुसंपादन अधिकारी यांना त्यांचे संचिकेसह चर्चा साठी बोलविले. त्यावेळी सदर जागे बाबत तत्कालीन विशेश भुसंपादन अधिकारी, तत्कालीन सहाय्यक संचालक नगर रचनासह मा.आयुक्तांनी चर्चा केली असता उप संचालक भुमी अभिलेख औरंगाबाद कार्यालयाकडे जागेबाबत वाद असल्याचे नमुद करुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 77 अन्वये (खाजगी वाटाघाटी) ऐवजी वि.भु. अधिकारी यांचेकडे रितसर भुसंपादन कार्यवाही चालु ठेवणे बाबत निर्णय घेतला त्यावर तत्कालीन मा.आयुक्त व सहा.संचालक नगर रचना यांचे सही आहेत. संचिका परि.क्र.100 (कृपया E वर जोडले आहे.)**

**सबब उक्त जागे बाबत वाद असल्याचे वरिष्ठ्यांचे पुर्वीचे निदर्शनास आले आहेतच  त्यामुळे मी सदर जागे बाबतचा वाद वरिष्ठयांचे निदर्शनास आणुन न देणे ही बाबत कितपत योग्य आहे.**

**मा.महोदय, मी असेनिदर्शनास आणुन देतो की, माझे शाखा अभियंता श्री.एम.वाय.शेख यांच्यावर सुध्दा वरील प्रमाणे दोषारोप होता. त्यांनी सुध्दा जागे बाबतचा वाद वरिष्ठयांचे निदर्शनास होता. असा त्यांच्या दोषारोपाच्या खुलासा मध्ये केला आहे. त्यामुळे श्री.एम.वाय.शेख यांचा खुलासा ग्राह्य धरुन निर्दोष मुक्तता केली.मला मात्र माझा दोषारोप सिध्द होतो असा निष्कर्ष काढले.**

**मा.सभापती महोदय, मी असे निदर्शनास आणुन देवु इच्छितो की, श्री.नंदलाल गुणवाणी यांनी त्यांचे विरोधात श्री. विश्वनाथ निकाळजे यांनी उप संचालक भुमी अभिलेख औरंगाबाद यांचेकडे जे अपिल होते. ते खारीज करणेसाठी अर्ज केला. त्यानुसार श्री.विश्वनाथ निकाळजे यांनी श्री.नंदलाल गुणवाणी व इतर दहा यांना अपिलातुन वगळणे बाबत उप संचालक भुमी अभिलेख औरंगाबाद यांना कळविल्यावरुन श्री.गुणवाणी व इतर 10 यांना अपिल मधुन वगळण्यात आल्याचे पत्र उप संचालक भुमी अभिलेख औरंगाबाद त्यांच पत्र क्रमांक अपिल न.भु.एस.आर/776/2004 दि.30/12/2004 अन्वये कळविले (कृपया F वर अवलोकन व्हावे.)**

**त्या पत्रानुसार श्री गुणवाणी यांनी तत्कालीन मनपा आयुक्त यांना पत्र देऊन जागेचा मोबदला मागणी केली. त्याचप्रमाणे तत्कालीन मा.आयुक्त तत्कालीन मा.मुख्य लेखाधिकारी व तत्कालीन सहाय्यक संचालक नगर रचना यांचे आदेशानुसार प्रस्ताव सादर केले असता प्रकरणांत मा.आयुक्तांनी विधी सल्लागार मनपा, विशेष भुसंपादन अधिकारी यांचा अभिप्राय घेतलेला आहे.**

**मा.महोदय, मी निदर्शनास आणु इच्छितो की, विधी सल्लागार मनपा यांनी त्यांच्या संचिकेत परिच्छेद क्र.111 व 112 वर अहवाल दिला आहे की, श्री.विश्वनाथ निकाळजे यांनी उप संचालक भुमी अभिलेख यांचेकडे अर्ज देऊन श्री नंदलाल गुणवाणी व इतर दहा यांचे न.भु.क्र.20722 पैकी 35000 चौ.मी. बाबत हितसंबंध व वाद नाही.असे प्रतिज्ञापत्र देऊन अपिलातुन वगळण्यात आले आहे. श्री.नंदलाल गुणवाणी व इतर 10 यांनी सादर केलेले पी.आर.कार्ड, नोंदणीकृत जी.पी.ए. इत्यादी**

संबंधीतांने सादर केलेले कायदेशीर कागदपत्रांची पुर्तता लक्षात घेता. संबंधीतांस मोबदला देणेस मान्य करणे योग्य असा अभिप्राय दिलेला आहे.

मा.महोदय, मी असे नम्र नमुद करतो की, सदर मिळकतीच्या मालकी हक्का बाबत वरिष्ठ स्तरावर सविस्तर चर्चा झालेली आहे. हे आपल्या लक्षात येईल. तात्पर्य वरिष्ठांची मंजुरी घेवुन पुढील भुसंपादनाची कार्यवाही झाली असुन श्री. साळुंके यांचे संपादीत क्षेत्र वि.भु.स.अ. यांचे मार्फत संपादन होवुन 464.68 चौ.मी. क्षेत्र दि.25/10/2001 रोजी मनपाचे नावे पी.आर नोंद घेतली आहे. तर श्री.गुणवाणी व इतर यांचे 3252.17 चौ.मी. क्षेत्र संपादन करुन दि.10/02/2005 रोजी मनपाचे नावे नोंद घेण्यात आली. सदर संपादीत क्षेत्र सन 2001 व 2005 पासुन सन 2007-08 पर्यंत मनपाच्या नांवे मालकी हक्कात पी.आर कार्डवर नोंद होती. मा.महोदय सदर जागेचा उपयोग मनपा शहर बस वाहतुक बस डेपो म्हणुन सुध्दा मनपाने वापर केलेला आहे सबब 2001 ते 2007-08 पर्यंत सदर जागा मनपाच्या नांवे पी.आर कार्ड होते. याबाबत कृपया विचार व्हावा.

मा.महोदय, मी एक वर्ग 3 चा कर्मचारी असुन वरिष्ठांनी दिलेले आदेशानुसारच प्रकरण सादरीकरण केलेले आहे. महोदय सादर कर्ता अधिकारी यांनी त्यांच्या अहवालात माझ्या विरोधात कोणतेही ठोस कागदोपत्री पुराव्यांच्या आधार न घेता फक्त मी सदर प्रकरण स्वतः हाताळले. एवढाच निष्कर्ष काढुन माझ्यावर कार्यवाही करण्या बाबत शिफारस केली आहे. (कृपया H वर अवलोकन व्हावे) तर चौकशी अधिकारी यांनी त्यांच्या चौकशीत असे नमुद केले आहे की, मी सदर प्रकरणांत हिरीहिरीने भाग घेतला आहे. मा.महोदय मी हिरीहिरीने भाग घेतला असता तर त्यावेळी प्रशासनाने मला सदर प्रकरण नेहमी-नेहमी का सादर करता असे लेखी विचारण करुन करणे दाखवा नोटीस देवुन माझ्यावर शिस्तीभंगाची कार्यवाही केली असती. पण तसे केली नाही. कारण सदर प्रकरण हे वरिश्ठांचे आदेशानुसारच सादर करण्यात आलेले आहे. मा.महोदय मी वर्ग-3 च्या कर्मचारी असुन कोणताही निर्णय घेणारा अधिकारी नाही. याबाबत विचार व्हावा. तसेच वरिष्ठयांच्या आदेशानुसार प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवण्यात आलेला आहे. असे उप अभियंता श्री. वझे साहेब यांनी त्यांचया दोषारोपाच्या खुलासा मध्ये सादर केलेले आहे. वरिष्ठांनी घेतलेला निर्णय हा खालच्या स्तरावर आणने आणी त्यास शिक्षा करणे, हे संयुक्तीक वाटत नाही. गुन्हेगाराला सोडुन सन्याशाला फाशी देणे सारखे होईल.

मा.महोदय माझ्या वरील तीनही दोषारोप बिनबुडाचे असुन मा.चौकशी अधिकारी व सादर कर्ता अधिकारी यांचे निष्कर्षाचे अवलोकन केले असता. उपरोक्त प्रमाणे कोणत्याही ठोस कागदोपत्री पुराव्यांचा आधार न घेता फक्त निष्कर्ष काढलेले असुन माझ्या खुलाशाचा विचार न करता मला सेवेतुन बडतर्फ करण्या सारखी अन्याय कारक कार्यवाही मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी केलेली आहे.

करीता मा.आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांचे आदेश जा.क्र./मनपा/ आस्था-1/2011/1270 दिनांक 06/09/2011 रद्द करुन मला दुय्यम आवेक्षक महानगरपालिका औरंगाबाद या पदावर दिनांक 06/09/2011 पासुन पुर्वलक्षी प्रभावाने कामावर घेण्यात यावे. ही नम्र विनंती.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

दोषारोप क्रमांक 1:- श्री जयराम नाथू साळुंखे यांच्याकडून जागेचा ताबा घेत असतांना प्रत्यक्षात मोजमाप न करता जागा ताब्यात घेणे.

दोषारोप क्रमांक 2:- प्रत्यक्षात 46468 चौमी जागा मनपाने संपादित केलेली असतानाही फक्त 259.335 चौमी जागा ताब्यात घेणे.

दोषारोप क्रमांक 3:- श्री गुणवानी यांच्याकडून संपादित करावयाच्या जागेबाबत वाद सुरु आहे हे माहिती असूनही सदरची बाब वरिष्ठांचे निदर्शनास आणून न देणे.

आस्थापना अधिकारी-1 :याबाबत प्रशासनाने दिनांक 17.08.2012 रोजी सविस्तर निवेदन सादर कलेले आहे. श्री जयराम नाथू साळुंखे यांच्याकडून जागेचा ताबा घेत असतांना प्रत्यक्षात मोजमाप न करता जागा ताब्यात घेणे. या संदर्भांत चौकशी अधिकारी यांनी नमुद केलेले आहे की, अपचारी श्री.गायकवाड यांनी श्री जयराम नथू साळुंखे यांच्याकडून 464.68 चौमी महानगरपालिकेच्या नांवे नोंद झाली असून ती मनपाच्या ताब्यात आहे असे दि.12/1/2005 रोजी सदरील मिळकतीच्या संचिकेतील पान क्र.एन-41 परि.119 मध्ये नमूद केले आहे, ही बाब चुकीची आहे. तसेच सादरकर्ता अधिकारी यांचे टाचणमध्येही सदर प्रकरण आलेले आहे. त्यामुळे हा दोषारोप सिध्द होतो असा निष्कर्ष चौकशी अधिकारी यांनी काढलेला आहे.

मा.सभापती :या जागेचा ताबा घेत असतांना मोजणी झाली होती का?

आस्थापना अधिकारी-1 :मोजणी झालेली आहे.

मा.सभापती :प्रशासनाचा आरोप आहे की, मोजमाप न घेता जागा ताब्यात घेतली.

आस्थापना अधिकारी-1 :464.68 चौमी जागा आहे आणि ती आपण ताब्यात घेतो असे संचिकेमध्ये सादरीकरण केलेले आहे. पान नंबर 119 मध्ये. कागदपत्र सोबत जोडलेले आहे. पान क्र.एन-41 परि.119 .

मा.सभापती :विशेष भुसंपादन अधिकारी यांनी 464.68 चौमीचा ताबा दिलेला आहे. त्याबाबतचे पत्र आहे. ताबापत्र आहे.

आस्थापना अधिकारी-1 :त्यावरूनच हे दिलेले आहे. प्रत्यक्ष जागा ताब्यात नाही.ते तपासयला पाहिजे होते. तपासणी करण्यात आलेली नाही.

मा.सभापती :विशेष भुसंपादन अधिकारी यांचे काम काय आहे? महानगरपालिका ताबा घेत असते का? कोण घेतो.

आस्थापना अधिकारी-1 :ताबा प्रत्यक्षात आपल्याला घ्यायचा असतो.

मा.सभापती :हे सर्व कार्य कोण करतो.

आस्थापना अधिकारी-1 : भुसंपादन अधिकारी पुर्ण करून दिले. त्यानंतर ते महानगरपालिकेच्या ताब्यात देतात.

मा.सभापती :पुर्ण कोण करतो.

आस्थापना अधिकारी-1 :भुसंपादन अधिकारी यांचेकडुन होते.

मा.सभापती :जागेची मोजणी वगैरे करून देतात. मोजणी कुणी करून दिलेली आहे.

आस्थापना अधिकारी-1 :भुसंपादन अधिकारी यांनी जे दिलेले आहे. ते मोजणी करून घेणे आपले काम आहे.

मा.सभापती :मोजणी करून भुसंपादन अधिकारी यांनी किती दिलेले आहे.

आस्थापना अधिकारी-1 :464.68 चौमी त्यांनी ताबा दिलेला आहे तो मोजून महानगरपालिकेने/आपण घ्यायचा. असा दोषारोप आहे.

मा.सभापती :विशेष भुसंपादन अधिकारी शासनाकडील आहे का? अधिकृत कार्यालय आहे? शासकीय कार्यालय आहे?

आस्थापना अधिकारी-1 :शासनाचे आहे. शासकीय आहे. अधिकृत कार्यालय आहे.

मा.सभापती :यांचे काम काय आहे.

आस्थापना अधिकारी-1 :भुसंपादन करण्याची कार्यवाही त्यांचेमार्फत होते. लॅन्ड ॲक्वेझेशनची सर्व कार्यवाही त्यांचेमार्फत होते आणि त्यांनी ताब्यात घेतल्यावर मोबदला वगैरे अदा करण्याचे सर्व पैसे आपण त्यांचेकडे देतो आणि त्यांनी घेतल्यानंतर कागदावर जो ताबा द्यायला लागले त्याच्याप्रमाणे ती मिळकत आहे का? पंचनामा करून आपण/महानगरपालिकेने ताब्यात घ्यायचे.

मा.सभापती :भुसंपादन अधिकारी जे काही सांगतो. संबधीत कार्यालय ते काम करतो.

आस्थापना अधिकारी-1 :होय बरोबर आहे.

मा.सभापती :महानगरपालिकेला काही वस्तु घ्यायची आहे. विशेष भुसंपादन अधिकारी जे सांगेल पेमेंट, व इतर करतो.

आस्थापना अधिकारी-1 :होय प्रश्नच नाही. आपणच करतो.

मा.सभापती :त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व करतो. स्वत:हुन महापालिका काही करत नाही. त्यांनी सांगीतल्यानुसार जागा एवढी आहे. जागेचे पैसे एवढे आहे. तेवढी रक्कम भरली जाते. हया कार्यालयाचे हे कार्य आहे. जे काही भुसंपादन होते ते हया अधिकाऱ्यांच्या मार्फत होते.

आस्थापना अधिकारी-1 :होय बरोबर आहे.

मा.सभापती :एसएलओ ताबा देतो.

आस्थापना अधिकारी-1 :ताबा घेतांना त्यांनी जे कागदावर जे लिहीले आहे ते प्रत्यक्ष पाहून प्रत्यक्ष ताबा घ्यायचा .

मा.सभापती :दोषारोप क्रमांक 2

आस्थापना अधिकारी-1 :प्रत्यक्षात जागेपेक्षा कमी जागा ताब्यात घेणे. चौकशी अधिकारी यांनी पान क्र.एन-41, परि.119 मध्ये नमूद केलेले आहे. दिनांक 12.01.2005च्या टिपणीमध्ये चुकीची माहिती सादर केलेली आहे. असे चौकशीमध्ये नमुद केलेले आहे आणि हा दोषारोप त्यांचेवर सिध्द होतो. सविस्तर निवेदन त्यात केलेले आहे.

मा.सभापती :464.58चौ.मी. संयुक्त मोजणी असते.

आस्थापना अधिकारी-1 :त्यांनी मोजणी करून दिल्यानंतर जागा ताब्यात घेतांना कागदावर जेवढे दाखविलेले आहे तेवढे आहे का?आपण/महानगरपालिकेने तपासून घेतले का? हा दोषारोप होता.

मा.सभापती :अवार्ड जाहिर झाले होते.

आस्थापना अधिकारी-1 :होय. खाजगी वाटाघाटीने केलेले आहे.

**मा.सभापती** :खाजगी वाटाघाटी करत असतांना भुसंपादन अधिकारी यांची भुमिका असेल.

**आस्थापना अधिकारी-1** :पेपरवर त्यांनी जे दाखविले तसे नाही.

**मा.सभापती** :दोषारोप क्रमांक 3 श्री.गुणवानी यांच्याकडून संपादित करावयाच्या जागेबाबत वाद सुरु आहे हे माहिती असूनही सदरची बाब वरिष्ठांचे निदर्शनास आणून न देणे.

**आस्थापना अधिकारी-1** :मालकी हक्काबद्दल वाद होता आणि ते निदर्शनास आणुन दिले नाही. दोषारोप सिध्द होतो. पान न.2 वर परिच्छेद 86,87, 31,32 याचा अहवालादेवुन सिध्द केलेले आहे.

**मा.सभापती** :कागदपत्र कुणी तपासायचे का? की, हेच व्यक्ती कागदपत्र तपासत होते.

**आस्थापना अधिकारी-1** :यांनी सादर केल्यावर वरिष्ठ अधिकारी यांनी तपासले आहे.

**मा.सभापती** :श्री.गायकवाड कुठल्या पदावर आहे.

**आस्थापना अधिकारी-1** :दुय्यम आवेक्षक पदावर आहे.

**मा.सभापती** :दुय्यक आवेक्षकला महापालिकेत/आपल्याकडे काय अधिकार आहेत.

**आस्थापना अधिकारी-1** :विभागाने त्यांचेवर जी जी कामे नेमुण दिली आहे त्यांना त्यानुसार त्यांनी ती संचिका सादर केलेली आहे. सादरीकरण केलेले आहे. जागेच्या ताब्यासंदर्भात नोंद केलेली आहे.

**मा.सभापती** :डायरेक्ट यांचे स्वाक्षरीने झालेले आहे का?

**आस्थापना अधिकारी-1** :यांचेवरील अधिकारी सुध्दा होते.

**मा.सभापती** :वरील कोणते अधिकारी होते.

**आस्थापना अधिकारी-1** :ADTP होते ते यामध्ये दोषी होते. त्यांचेवर गुन्हा दाखल केलेला आहे. शासनाचे अधिकारी असल्यामुळे शासनाला तसे कळविलेले आहे. त्यांचेवर कारवाई करण्याचा अधिकार शासनाला आहे.

**मा.सभापती** :आयुक्त,विधी सल्लागार व इतर कुणी यात नव्हते का? कमिटी होती का?

**आस्थापना अधिकारी-1** :यामध्ये कमिटी नव्हती.

**मा.सभापती** :कागदपत्र वरिष्ठ अधिकारी यांनी तपासले.

**आस्थापना अधिकारी-1** :यावरील अधिकारी आहेत. त्यांनी ते पाहिले.

**मा.सभापती** :उपआयुक्त यामध्ये होते का?

**आस्थापना अधिकारी-1** :उपआयुक्त साहेब चेक इश्यु करण्यामध्ये होते. तांत्रिक बाबीमध्ये त्यांचा संबध नाही. चेक संदर्भात संदर्भ आहे.

**श्री.सिताराम गायकवाड** :जे 468.64 चौ.मी.क्षेत्र ऐवजी 259.33 चौ.मी.क्षेत्र जागेचा ताबा घेतला.हा जो आरोप माझ्यावर सिध्द केला ते कशावरून सिध्द केला हे स्पष्ट होत नाही.विशेष भुसंपादन अधिकारी यांनी मला जे कागदपत्र दिलेले आहे.विशेष भुसंपादन अधिकारी यांनी मोजणी करून दिलेली आहे. त्या मोजणी नकाशाप्रमाणे व त्यांच्या मालकी हक्का नंतर जे क्षेत्र होते. ते जागेवर प्रत्यक्ष मोजुनच ताबा घेतलेला आहे आणि त्यांचे कार्यपध्दतीनुसार कार्यवाही केलेली आहे. माझा यात कुठेही दोष नाही. त्यांनी जी मोजणी केली ती कुठल्या आधारे केली. किंवा सिटी सर्वे कार्यालयाचे अधिकारी नेले होते काय? याचा खुलासा केलेला नाही.

**<u>निर्णय :</u>**

आजच्या सभेपुढे असलेल्या अपिला संदर्भात अपिलकर्ता श्री.सिताराम शंकर गायकवाड व प्रशासनाचे म्हणणे ऐकुन घेतले असून या अपीलावरील निर्णय राखुन ठेवण्यात येत आहे. सर्व अपिलांची सुनावणी झाल्यानंतर निर्णय घोषीत करण्यात येईल.

**विषय क्र. 45 :**

मा.उच्च न्यायालय मुंबईचे औरंगाबाद खंडपीठाने याचिका क्र.7005/2011दिनांक 10/07/2012 रोजी दिलेल्या निर्णयानुसार श्री.दिगंबर माणिकराव शहापुरवाड, अनुरेखक (सध्या सेवेतून काढून टाकले आहे.) मनपा, औरंगाबाद यांनी कार्यालयीन आदेश क्रमांक मनपा/आस्था-1/2011/1271, दिनांक 06 सप्टेबंर 2011 अन्वये त्यांना महानगरपालिका सेवेतून काढून टाकण्याच्या आदेशाविरूध्द स्थायी समितीकडे सादर केलेल्या अपिलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

श्री.दिगंबर शहापुरवाड : सन्माननिय सभापती महोदय, मा.आयुक्त, मला सभागृहामध्ये संधी मांडण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला ऋणी आहे. मी सन 1998 ते 2005 या कालावधी मध्ये मालमत्ता विभागात अनुरेखक या पदावर कार्यरत असतांना माझ्यावर रेखांकनातील खुल्या जागा, संपादीत केलेल्या जागा महानगरपालिकेच्या नावे करण्यासाठी नगर भुमापन अधिकारी कार्यालय यांचेकडे पाठपुरावा करणे संबंधी व सदर जागांची नोंद मालमत्ता प्राप्त अभिलेखात घेणे व इतर वरिष्ठांनी आदेशित केलेली कामे करणे या बाबत आदेश काढण्यात आले होते. (कृपया A वर अवलोकन व्हावे.)

महोदय, याच दरम्यान दिनांक 19/01/2005 रोजी नगर रचना विभागातील पत्र जा.क्र/मनपा/नरवि/भुस/192/2005, दिनांक 19/01/2005 रोजी नगर भुमापन अधिकारी श्री. शहापुरवाढ संचिका तयार करा असा आदेश दिलेले पत्र आवक क्र.224 अन्वये दिनांक 19/01/2005 रोजी माझेकडे प्राप्त झाले.सदर पत्रामध्ये मंजुर विकास योजना आरक्षण क्र.87 प्राथमिक शाळा व आरक्षण क्र.88 क्रिडांगणासाठी संपादीत क्षेत्र 3252.17 चौ.मी. चा उल्लेख करुन त्या पत्रासोबत नोंदणीकृत खरेदीखत जोडण्यात आले होते. (कृपया नगर रचना विभागाचे पत्र B वर अवलोकन व्हावे.)

महोदय, सदर संपादित जमीन क्षेत्र 3252.17 चौ.मी. ची मालकी उपआयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद असल्याचे नोंद नगर भुमापन कार्यालय यांचेकडील आखीव पत्रीकेवर दिनांक 10/02/2005 रोजी घेण्यात येवुन न.भु.क्र.20722 आखीव पत्रीका उघडण्यात आली. (कृपया आखीव पत्रीका C वर अवलोकन व्हावे.)

महोदय, सदरील संपादीत जमीन न.भु.क्र.20722 क्षेत्र 3252.17 चौ.मी. एवढ्या जागेचा ताबा नगर रचना विभागाकडुन मालमत्ता विभागाकडे आल्याबाबत असाधारण ताबा पावती करावी लागते. मालमत्ता विभागाचे प्रचलीत धोरणानुसार दिनांक 17/02/2005 संपादन केलेल्या जमीनीच्या ठिकाणी हजर झालो असता. सदर ठिकाणी खरेदीखत करुन देणारे मुखत्यारे आम श्री.नंदलाल गोविंदराव गुणवाणी हे हजर होते. सदरील जागेची पाहणी केली असता संपादीत जमिनीस संरक्षीत भिंत होती. व त्या जागेमध्ये मोठ-मोठी झाडे झुडपे व एरंडा,येड्या बाभळीचे मोठी झाडे होती. त्या जागेमध्ये अंदाजे 8X15 या

आकाराचे मोडकळीस आलेले बांधकाम होते. परंतु सदर ठिकाणी कोणीही राहात नव्हते.

महोदय, संपादीत जमिनीचे ताबा पावती करतांना

1) मा.स्थायी समिती ठराव क्र.179 दि. 13/01/2005 अन्वये

2) दस्तऐवज क्र. 199,दिनांक15/01/2005 रोजी झालेले सदर जमीनीचे खरेदीखत.

3) संपादीत क्षेत्र 3252.17 चौ.मी. जागा उपआयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांचे नांवे उघडण्यात आलेले न.भु.क्र.20722 ची आखीव पत्रीका.

या कायदेशीर तीन बाबी तपासुन दिनांक 17/02/2005 रोजी पंचासमक्ष ताबा पावती तयार करण्यात येवुन त्या ताबा पावतीवर पंचाच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या. (कृपया ताबा पावती Dवर अवलोकन व्हावे.)

महोदय, औरंगाबाद शहर प्रारुप विकास योजना आरंक्षण क्र.87 व 88 माळजीपुरा,पुष्पनगरी न.भुऱ्क्र.20722 संपादीत केलेल्या जमीनीमध्ये अनियमितते बाबत माझ्यावर एकुण दोन (2) दोषारोप ठेवण्यात आले होते. संयुक्त विभागीय चौकशी अहवाला अन्वये दोन दोषारोपा पैकी एक(1) दोषारोप सिध्द झाला म्हणुन चौकशी अहवाल नमुद केले आहे. माझ्यावर ठेवण्यात आलेला दोषारोप परस्पर चौकशी अधिकारी यांनी सिध्द केलेला आहे. जो की सिध्द अपराधात मोडत नाही. (कृपया ज्ञापन E वर अवलोकन व्हावे.)

<u>दोषारोप</u> <u>:-</u> जागेचा ताबा घेत असतांना त्या जागेत श्री. रंगनाथ आसाराम पाटील या नावाची व्यक्ती राहत असतांनाही ही बाब कार्यालयाच्या निदर्शनास आणुन न देणे.

महोदय, सदरील चौकशी मुळ आरंभापासुन चुकीच्या पध्दतीवर आधारीत आहे. चौकशी करत असतांना कुठल्याही प्रकारचे साक्ष पुरावे तपासले गेले नाहीत. तसेच सुनावणी घेतली नाही. व साक्ष पुरावा देण्यासाठी संधी दिलेली नसतांना क्र.(1) जमीन संपादन करणे, (2) ताबा घेणे (3) दिनांक 18/01/2007 च्या प्राथमिक चौकशी अहवाला मध्ये सदर संपादीत जागेमध्ये रंगनाथ आसाराम पाटील हे कुटुंबीयासह राहात असल्याची बाब, (4) श्री. रंगनाथ पाटील यांना नळ जोडणी,विजेची जोडणी दिल्याचे दिसते. तसेच त्यांच्या घरास मालमत्ता कराची आकारणी केल्याची दिसते त्यांनी दिनांक 06/09/2007 रोजी मालमत्ता कर भरल्याची पावती दाखवली याचा अर्थ त्यांचा या ठिकाणी ताबा आहे.(5) रंगनाथ आसाराम पाटील यांचा जागेचा ताबा घेतला नाही. (6) प्रत्यक्ष जागेवर न जाता दि, 17/02/2005 रोजी ताबा पावती केली. या बाबी चौकशी अहवालात नमुद करुन माझ्यावर ठेवण्यात आलेला दोषारोप सिध्द होतो. असा एकतर्फी चौकशी अहवाल चौकशी अधिकाऱ्याने तयार केला आहे. (कृपया भागशः अहवाल Fवर अवलोकन व्हावे.)

महोदय, चौकशी अधिकारी यांनी आकस बुध्दीने चौकशी अहवालात नमुद केलेल्या बाबींचा खुलासा या प्रमाणे देत आहे.

1) <u>जमीन संपादन करणे.</u>

खुलासा :- जमीन संपादन करणे नगर रचना विभागाच्या कार्य प्रणालीत येते. भुसंपादन कार्यवाही केलेला संचिकेमध्ये माझा एक ही अभिप्राय नोंदविलेला नाही. माझ्या मार्फत जमीन संपादन करण्याची कार्यवाही होत नव्हती.

2) ताबा घेणे

खुलासा :- मालमत्ता विभागाच्या प्रचलीत धोरणानुसार नगर रचना विभागाने संपादन केलेली जागा प्राप्त अभिलेखात नोंद घेणेसाठी ताबा पावती करावी लागते या बाबत मला आदेशीत केले होते. ताबा पावती केली म्हणुन मी माझ्या कर्तव्यात कसुर केला किंवा मनपाचे आर्थिक नूकसान झाले, असे म्हणता येणार नाही.

3) दि.18/01/2007 च्या प्राथमिक चौकशी अहवाला मध्ये श्री.रंगनाथ आसाराम पाटील कुटुंबीयासह राहात असल्याची बाब.

खुलासा :- मी.दि.17/02/2005 रोजी संपादीत जमीनीची ताबा पावती केली. प्राथमिक चौकशी मी सदर जमीनीचा ताबा घेतल्याच्या दोन वर्षानंतर दि.18/01/2007 रोजी करण्यात आली. संपादीत जागेमध्ये अतिक्रमण करुन कोणी राहात असेल तर प्रशासकीय विभागाकडुन अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीस जागेतुन बाहेर काढणे आवश्यक होते. तसे न करता उलट माझ्यावर शिस्त भंगाची कार्यवाही प्रस्तावित केली, हे कुठल्याही नियमात बसत नाही.

4) श्री.रंगनाथ आसाराम पाटील यांना नळ जोडणी, दिल्याचे दिसते, तसेच त्यांच्या घरास मालमत्ता कराची आकारणी केल्याची दिसते. त्यांनी दि.06/09/2007 रोजी मालमत्ता कर भरल्याची पावती दाखवली याचा अर्थ त्यांचा या ठिकाणी ताबा आहे.

खुलासा :- श्री.रंगनाथ आसाराम पाटील यांचे सदरील जागा संपादन करण्यापुर्वी सदर ठिकाणी 8x 15 या आकाराचे मोडकळीस आलेले त्यांचे बांधकाम असेल त्यांनी जमीन संपादन झाल्यानंतरही मुख्त्यारे आम म्हणुन श्री. नंदलाल गुणवाणी यांना दिलेल्या भुखंडावर आपला हक्क, ताबा राहील व जमीन संपादन केलेल्य कार्यवाहीस बाधा येण्यास मदत होईल या वाईट हेतुने वार्ड ड कार्यालयात जावुन सन 2003 ते 2006 पर्यंत जुना रजिसटर क्र.3 एन पान क्र. 278 वर रु.307/- पावती क्र. 128618 अन्वये दि.16/02/2006 रोजी मालमत्ता कराचा भरणा केला होता. सदर मालमत्ता कर भरल्याची पावती, नळ जोडणी, प्राथमिक चौकशी 18/01/2007 मध्ये करतांना दाखवली म्हणुन, दिनांक 17/02/2005 रोजी ताबा पावती करताना त्यांचा ताबा होता असे म्हणने चौकशी अधिकाऱ्याचे नियमास अनुसरुन नाही. या वरुन चौकशी अहवालामध्ये चुकीचा बाबी नमुद केल्या या वरुन स्पष्ट होते.

5) रंगनाथ आसाराम पाटील यांच्या जागेचा जाबा घेतला नाही.

खुलासा :- संपादन केलेली जमीन क्षेत्र 3252.17 चौ.मी. खरेदीखता मध्ये नमुद आहे. अखिव पत्रीकेवर तेवढ्याच क्षेत्राची नोंद महानगरपालिका नांवे करण्यात आलेली आहे. संपादीत क्षेत्र 3252.17 चौ.मी. या क्षेत्रामध्ये श्री.रंगनाथ गोविदराम गुणवाणी

यांना मुखत्यारे आम म्हणुन दिलेले आहे. जी.पी.ए.(जनरल पावर ऑफ अटर्नी) श्री.नंदलाल गुणवाणी यांचेकडुन सदरील जागेची ताबा पावती दोन पंचासमंक्ष घेण्यात आलेली आहे. श्री.पाटील यांनी अधिकृत रित्या जी.पी.ए(जनरल पावर ऑफ अटर्नी) श्री. नंदलाल गुणवाणी यांना करुन दिले असल्याने श्री. पाटील यांचेकडुन सदरील जागेचा ताबा घेण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. व ताबा पावती करतांना कोणीही हरकत घेतली नाही.कृपया ताबा पावतीचे अवलोकन व्हावे.

6) <u>प्रत्यक्ष जागेवर न जाता दिनांक 17/02/2005 रोजी ताबा पावती केली.</u>

<u>खुलासा</u> <u>:-</u> दिनांक 17/02/2005 रोजी ताबा पावती प्रत्यक्ष संपादीत केलेल्या जागेवर तयार करण्यात आली आहे. ताबा पावती करतांना सदर ठिकाणी दोन पंच हजर होते. ताबा पावतीवर पंच 1) श्री.अनिल रतनसिंग राजपुत, 2) श्री.नटराज भरत शुक्ला, यांनी स्वाक्षऱ्या केलेल्या आहेत. या बाबत पंचानी प्रत्यक्ष जागेवर हजर असल्या बाबतचे शपथपत्र दिले आहे. (कृपया शपथपत्र G वर अवलोकन व्हावे.)

महोदय, चुकीच्या आधारावर चौकशी अहवालातील नमुद बाबीच्या खुलास्यावरुन चौकशी अधिकारी यांनी मानवतेचा दृष्टीकोन व दोषारोप झाल्यानंतर यावरुन उद्‌भवणाऱ्या संभाव्य घडामोडीचा थोडासुध्दा विचार केला नाही. यावरुन स्पष्ट होते.

महोदय, तत्कालीन मालमत्ता अधिकारी यांनी दिनांक 15/01/2005 रोजी सदर जागेची पाहणी करुन संपादीत क्षेत्र 3252.17 चौ.मी. जागेचे जी.पी.ए. श्री. नंदलाल गोविंदराम गुणवाणी यांचेकडुन खरेदीखत करुन घेतले व मी सदर संपादीत जागेचा ताबा पावती दि.17/02/2005 रोजी केली. तत्कालीन मालमत्ता अधिकारी व माझ यावरील दोषारोप एक सारखे असतांना चौकशी अधिकारी यांनी तत्कालीन मालमत्ता अधिकारी यांच्यावर ठेवण्यात आलेले दोषारोप सिध्द हो नाही. व माझ्यावर ठेवण्यात आलेले दोषारोप सिध्द होतो. असे निष्कर्ष काढुन चौकशी अधिकारी यांनी कायद्याची पायमल्ली करुन चौकशी अहवाल तयार केला आहे. (कृपया चौकशी अहवालातील भागश: निष्कर्षाचा सारांश H वर अवलोकन व्हावे.)

सभापती महोदय, मी 26 वर्षापासुन महानगरपालिकेची सेवा करुन मी व माझे कुटुंबातील सर्व सदस्य औरंगाबाद सारख्या महागड्या शहरामध्ये जीवन जगत असतांना चौकशी अधिकारी यांनी चुकीच्या मार्गाने विभागीय खाते चौकशी करुन एकतर्फी दोषारोप सिध्द केल्यामुळे मला दि. 06/09/2011 पासुन महानगरपालिका सेवेतुन काढुन टाकण्यात आलेले आहे. या चुकीच्या निर्णयामुळे मी व माझ्या कुटुंबीतील सर्व सदस्यांचा जीवन जगण्याचा अधिकार हिसकावुन घेतल्यामुळे माझ्या कुटुंबावर उपास मारीची वेळ आलेली आहे.

महोदयांना कळकळीची विनंती करतो की, माझे अपील मंजुर

| | |
|---|---|
| | करण्यात येवुन मा.आयुक्त यांचे क्र.मनपा/आस्था-1/2011/1271 दिनांक 06/09/2011 चे आदेश रद्द करुन मला दिनांक 06/09/2011 पासुन पुर्वलक्षी प्रभावाने कामावर घेण्यात यावे, ही कळकळीची नम्र विनंती. मला माझी बाजु मांडण्याबाबत संधी उपलब्ध करुन दिली. त्या बाबत मी आपला आयुष्यभर ऋणी राहील. |
| मा.सभापती | :प्रशासनाने खुलासा करावा. |
| आस्थापना अधिकारी-1 | :प्रशासनातर्फेश्री.शहापुरवाड यांचेवर प्रशासनातर्फे दोन दोषारोप लावण्यात आले होते त्यापैकी एक दोषारोप सिध्द झाला म्हणुन चौकशी अधिकारी यांनी चौकशी अहवाल दिलेला आहे आणि त्याचे सविस्तर निवेदन दिनांक 17.08.2012 रोजी मा.सभापती यांना सादर करण्यात आलेले आहे. |
| मा.सभापती | :जागा ताब्यात घेत असतांना. |
| आस्थापना अधिकारी-1 | :रंगनाथ आसाराम पाटील तिथे राहतात हे पंचनाम्यामध्ये नमुद केले नाही. अशा स्वरूपाचा दोषारोप त्यांचेवर होता. |
| मा.सभापती | :जागा ताब्यात केव्हा घेत असतो. |
| आस्थापना अधिकारी-1 | :सर्वात शेवटी जागा ताब्यात घेतो. |
| मा.सभापती | :जागा ताब्यात घेणे हा शेवटचा टप्पा आहे. सुरूवात कोणकोणत्या टप्प्याने येते कोण सुरूवात करतो. |
| आस्थापना अधिकारी-1 | :सुरवातीला ज्या व्यक्तीची जागा आहे. महानगरपालिकेला ती जागा संपादित करायची असेल तर तसा तो प्रस्ताव देईल. महापालिकेला त्या जागेवर आरक्षण ठेवायचे आहे. ती जागा ताब्यात घेईल तसे कळवेल. |
| मा.सभापती | :वाटाघाटीने झालेले आहे का? |
| आस्थापना अधिकारी-1 | :वाटाघाटीने झालेले आहे. |
| मा.सभापती | :प्रायव्हेट वाटाघाटी करण्याचा महापालिकेत कुणाला अधिकार आहेत. |
| आस्थापना अधिकारी-1 | :त्या वेळेस प्रशासनाने तसा निर्णय घेतलेला आहे.मा.आयुक्तांतर्फे तत्कालिन मुख्यलेखाधिकारी यांनी तसा प्रस्ताव सादर केलेला आहे की, सदर जागा घेणे आवश्यक आहे. भुसंपादनाला उशीर होतो म्हणुन खाजगी वाटाघाटीने करण्यात यावे. |
| मा.सभापती | :ताबा पावती हा शेवटचा टप्पा आहे. यापुर्वी/अगोदर जागेवर कुणी गेले नाही का? ताबा पावती घेणाऱ्या कर्मचारी/अधिकारी यांचे वर्गवारी कोणती आहे. पद कोणते आहे? |
| आस्थापना अधिकारी-1 | :ज्यास प्राधिकृत केलेले आहे. संचिकेवरून तोच घटक जागेवर गेलेला आहे. प्रत्यक्षात जागेवर गेलेला आहे किंवा नाही हे मला माहित नाही. |
| मा.सभापती | :कुठलेही इस्टीमेट सही करतांना साईड बघीतली जाते की नाही. |
| शहर अभियंता | :साईड बघीतली जाते. |
| मा.सभापती | :दुय्यम आवेक्षक यांनी बघीतलेली चालेल का? |
| शहर अभियंता | :वरिष्ठांनी बघीतले पाहिजे. |
| मा.सभापती | :मोबदला झाला होता, रजिष्ट्री झाली होती. |
| आस्थापना अधिकारी-1 | :7 लाख रूपये अदा केलेले आहे. |

मा.सभापती :ताबा घेण्यापुर्वी प्रक्रीयेमधील कुणीतरी साईडवर गेलेले असेल.

आस्थापना अधिकारी-1 :संचिकेवर सादरीकरण केलेले आहे. प्रत्यक्ष जागेवर गेले की, नाही हे मला माहित नाही. त्यांनी असे नमुद केलेले नाही की आम्ही स्थळ पहाणी केलेली आहे.

मा.सभापती :सर्व चौकशी कोणी केलेली आहे.

आस्थापना अधिकारी-1 :तत्कालिन मुख्य लेखापरिक्षक यांनी चौकशी केलेली आहे.

मा.सभापती :संबधीत मालमत्ता अधिकारी, टाऊन प्लॅनिंग हि सर्व प्रक्रीया आहे.

आस्थापना अधिकारी-1 :सर्व लोकांवर दोष ठेवलेलेच आहे. प्रत्येक घटक आपआपल्या परीने दोषी आहे. त्यांचेवर दोषारोप बजावलेले आहे. जे शासनाचे अधिकारी होते. तसे शासनाला कळविलेले आहे. बाकी अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करा म्हणुन त्यांचेवर गुन्हे दाखल केलेले आहे.

मा.सभापती :विधी विभागाचा अभिप्राय घेण्यात आलेला होता. या ठिकाणी कुणी राहतो म्हणुन लिगलचा अभिप्राय आहे का?

आस्थापना अधिकारी-1 :राहणेसंदर्भात अभिप्राय नाही. त्यांचा दोषारोप वेगळा होता.

मा.सभापती :पेपरबाबत सगळी तपासणी झालेली आहे का?

आस्थापना अधिकारी-1 :स्थळ पहाणी संदर्भात नाही.

मा.सभापती :ताबा घेतांना स्थळ पहाणी झाली. त्याच्या पुर्वी स्थळ पहाणी झाली हे कुठे लिहिलेलेच नाही. फक्त शेवटी स्थळ पहाणीला गेले. पैसे देतांनाही कुणी पहाणी केली नाही. जागा आहे की, नाही जागेवर जागाच नाही. रजिष्ट्री केली, पीआर कार्ड वर नांव आले आणि शेवटी ताबा घेण्यासाठी गेल्यास तेव्हा लक्षात आले की त्या ठिकाणी रूम आहे. स्थळ पहाणी झालेली नाही. त्या पहाणीच्या हिशोबाने देयक देण्यात येत आहे. मोबदला देण्यात येत आहे. असे कुठे लिहिलेले नाही. ताबा हा शेवटचा म्हणजे Z आहे A ते X पर्यंत काय झाले याचा कुठेच उल्लेख नाही. फक्त पेपरवर्क झालेले आहे. एकही अधिकारी जागेवर स्थळ पहाणी करण्यासाठी गेलेले नाही. मा.आयुक्त,उपआयुक्त, मालमत्ता अधिकारी, सहायक संचालक नगर रचना कुणीही अधिकारी स्थळ पहाणीसाठी गेले नाही. ताबा पावती हा शेवटचा घटक आहे.

निर्णय :

आजच्या सभेपुढे असलेल्या अपिला संदर्भात अपिलकर्ता श्री.दिगंबर माणिकराव शहापुरवाड व प्रशासनाचे म्हणणे ऐकुन घेतले असून या अपीलावरील निर्णय राखुन ठेवण्यात येत आहे. सर्व अपिलांची सुनावणी झाल्यानंतर निर्णय घोषीत करण्यात येईल.

श्री.नारायण कुचे :सुमित कन्स्ट्रक्शन यांना काळया यादीत टाकण्यात आलेले आहे. माझ्या वार्डातील टेंभुर्णी एजन्सी गेल्या दिड वर्षापासून काम केलेले नाही. त्यांना काळया यादीत टाकण्यात आले नाही. अशा किती तरी एजन्सी आहेत. सुमित कन्स्ट्रक्शनला पुन्हा काम करण्याची परवानगी देण्यात यावी.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता(बिओटी) :महानगरपालिकेत ज्या एजन्सी काम करीत नाही. काम करा म्हणुन वारंवार स्मरण देण्यात येते. काम केले नाही तर नियमाप्रमाणे वेळ

देतो. स्मरण देतो तरीही काम करीत नाही. स.सदस्य श्री.गिरजाराम हळनोर साहेबांच्या वार्डातील काम होते वारंवार काम करण्याबाबत स.सदसय विनंती करत होते. त्यानुसार सदर एजन्सीला काम करण्याबाबत स्मरण देण्यात आले. स्वत: सांगण्यात आले. सहा महिण्यांपासून काम करण्यासाठी पाठपुरावा करत आहे. अधिकारी/उपअभियंता/अभियंता यांनी त्यांना काम करण्यास सांगीतले. परंतु काम केले नाही. मग अशा परिस्थिती काय करायचे? दोन कंत्राटदारांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :सलिम अली सरोवर किंवा ओिटीवरील कंत्राटदारांना वारंवार मुदतवाढ देण्यात येते. सदरील बाबी यांना का लागू होत नाही. कंत्राटदाराची काम करण्याची इच्छा असेल तर इतरांना ज्या प्रमाणात मुदतवाढ देण्यात येते त्याप्रमाणे त्यांनाही मुदतवाढ देण्यात यावी.

मा.सभापती :स.सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे ज्यांची मुदत संपलेली असतांना मुदतवाढ देण्यात आली. पेमेंट मिळत नसल्याने काम करण्यास कंत्राटदार मागेपुढे पाहत होते. सभागृहानेही काम सुरू करण्याबाबत वारंवार सांगितले आहे. सुमित कन्स्ट्रक्शन यांचेकडुन लेखी घेण्यात यावे की, ते काम करायला तयार आहेत. काम करण्यास तयार असेल तर ताबडतोब त्यांचा विचार व्हावा. सुमित कन्स्ट्रक्शनच्या विनंतीनुसार त्यांना काळया यादीतुन ताबडतोब वगळण्यात यावे. 2 टक्के भरून ताबडतोब काम सुरू करण्यात यावे.

श्री.गिरजाराम हाळनोर :आर.के.कंन्स्ट्रक्शन यांना डांबरीकरणाचे काम दिले होते ते अद्यापपर्यंत करण्यात आलेले नाही. त्यांना पार्ट पेमेंट केलेले आहे. त्यांना काळया यादीत टाकणार आहे का? खुलासा करण्यात यावा. पेव्हर बसविण्याचे काम श्री.चव्हाण नावाच्या गुत्तेदाराने घेतले होते. त्याचे भुमिपुजन झालेले आहे ते काम जुन सुरू झालेले नाही. त्यांना काळया यादीत टाकणार आहे का? द्वेष भावनेने एखाद्या एजन्सीला टार्गेट करणे बरोबर नाही.

मा.सभापती :आजच्या आज संचिका पुटअप करून दोन टक्के भरून कामाला सुरूवात करण्यात यावी.

श्री.नारायण कुचे :वर्तमानपत्रात वाचण्यात आले की, विकास कामे काही रद्द करणार आहे म्हणुन मा.आयुक्त यांनी पदाधिकारी यांना पत्र दिले आहे. वार्डातील नागरीकांनी वार्डाचा विकासासाठी आम्हाला निवडून दिलेले आहे. याबाबत खुलासा करण्यात यावा.

श्री.बाळासाहेब मुंडे :मा.आयुक्तांनी कामे रद्द करावी म्हणुन स्टेंटमेंन्ट दिलेले आहे. ते योग्य नाही.

श्री.गिरजाराम हाळनोर :सन 2012-13चे बजेटच कालपर्यंत मंजूर झालेले नव्हते प्रकाशित झालेले नव्हते कशाच्या आधारे सन 2012-13 चे कामे रद्द करण्यात यावी. आवश्यक कामे करण्यात यावी. आवश्यक कामे कोण ठरवणार? पाणी, ड्रेनेज, विद्युत हि अत्यावश्यक कामे आहेत. शासन दुष्काळ निवारण करण्यासाठी विशेष निधी देण्यात येतो. परंतु मा.आयुक्तांनी दुष्काळसदृष्य परिस्थिती निर्माण होत असल्याने कामे रद्द करण्यात येत आहे. शहरातील तरूणांना बेरोजगार करायचे आहे

का? हे यातुन कळत नाही. प्रशासनामार्फत खुलासा करण्यात यावा. बजेटमध्ये तरतुद नसतांना सर्वांनी बजेटमध्ये तरतुद नसतांना शहराचा विकास होण्याच्या दृष्टीने सर्वांनी मान्यता दिली. कोणते कामे आवश्यक, अत्यावश्यक हे नगरसेवकांना माहिती असते म्हणुन बजेटमध्ये तशी तरतुद करण्याची विनंती ते करतात. प्रशासनाने सहकार्याची भुमिका ठेवावी. या पत्रामागची प्रशासनाची भुमिका काय आहे हे सांगण्यात यावे.

**श्री.मो.मुजीबोद्दीन कदीरोद्दीन** :शहराच्या विकासावर वार्डावर याचा परिणाम होईल. नगरसेवक म्हणुन आमच्यावर नागरीकांचा विपरित परिणाम होईल. संजयनगर वार्डात मी स्वतः उभा राहुन अतिक्रमण काढण्यात आले. दिड वर्षापासून मा.आयुक्तांकडे चर्चासाठी संचिका गेलेली आहे. परंतु काम झाले नाही.

**श्री.विजेंद्र जाधव** :प्रशासनाला वारंवार सहकार्य केलेले आहे. नागरीकांना जे आश्वासन दिलेले आहे त्याची पुर्तता कशी होणार? कोणतेही विकास कामे रद्द करण्यात येवु नये.

**श्रीमती घडमोडे सविता** :अनेक दिवसांपासून राष्ट्रमाता जिजाऊ उद्यान व कम्युनिटी सेंटरबाबत प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे परंतु काम होत नाही. तसेच चौधरी कंन्स्ट्रक्शन, अरबाझ, राठोड कंन्स्ट्रक्शन यांनी घेतलेल्या कामावर कुठलीच कार्यवाही झालेली नाही. चौकशी करण्यात यावी.

**श्री.आगा खान मिया खान** :मागील बैठकीत साईड ड्रेनेज आणि जलवाहिनीबाबत चर्चा करण्यात आली होती त्यावेळेस माझा राजीनामा परत घेण्यासाठी मा.सभापती व स.सदस्यांनी, प्रशासनाने आश्वासन दिले होते की, काम होईल. रस्ता रूंदिकरणात झाले आहे. वॉटर सप्लायच्या कामांना मंजूरी होवुन तीन महिने झालेले आहे. अजुनही काम चालू झालेले नाही. येणाऱ्या मोठया समस्या निर्माण होतील अतिक्रमण वाढेल. प्लॉटही मिळत नाही व आपली जमीनही चालली हि नागरीकांच्या मनातील भिती उद्या समस्या निर्माण करू शकते. वॉटर सप्लाय आणि ड्रेनेज लाईनचे काम ताबडतोब सुरू करण्यात यावे.

**मा.सभापती** :स.सदस्या श्रीमती घडमोडे यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्याबाबतीत खुलासा करण्यात यावा.

**उपअभियंता (वार्ड इ)** :प्रभाग क्रमांक 77 कम्युनिटी सेंटरची दुरूस्ती कामाचे अंदाजपत्रक मा.महापौर यांनी सुचविलेल्या अत्यावश्यक कामाच्या तरतुदीमधुन प्रसिध्द करण्यात आलेले आहे. सन 2011-12 च्या अर्थसंकल्पात सदरील कामाचा समावेश करण्यात आलेला नाही. राजमाता जिजाऊ उद्यान येथील काम मंजूर झालेले असुन निवीदा मंजूरीस्तव एप्रिलमध्ये पाठविण्यात आलेली आहे.

**मा.सभापती** :अजून निवीदा मंजूर नाही. स्पिल वाढण्याचे हेच कारण आहे. बजेटमध्ये तरतुद असतांना मंजूरी का झाली नाही?

**कार्यकारी अभियंता (बिओटी)** :सदरील संचिका कुठल्या स्टेजवर आहे ते तपासून काम करण्यात येईल. बजेटमध्ये असेल तर काम करण्यात येईल. वार्डात काम केले नाही म्हणुन अनिस चौधरी कंत्राटदारास ब्लॅकलिस्ट केलेले आहे.

| | |
|---|---|
| | स्थायी समितीने निर्णय दिलेला आहे की, सहानुभूतिपुर्वक विचार व्हावा. संचिका पुटअप करण्यात आलेली आहे. |
| मा.सभापती | :तात्काळ काम करण्यात यावे. चौधरी कंन्स्ट्रक्शन, सुमित कंन्स्ट्रक्शन यांना ब्लॅकलिस्ट मधुन काढण्याबाबत आदेशित केलेले आहे. त्यावर कार्यवाही करण्यात यावी. तसेच स.सदस्य श्री.बाळुलाल वरदाजी गुजर यांचे वार्डातील काम करण्यात यावे. |
| कार्यकारी अभियंता (बिओटी) | :एक संचिका वर्क ऑर्डरमध्ये आहे व दुसरी चर्चा अंतर्गत आहे. |
| मा.सभापती | :स.सदस्या श्रीमती सविता घडमोडे यांचे वार्डातील राजमाता जिजाऊ महिला उद्यान यंथील काम सुरू करणे तसेच श्री.चौधरी, सुमित कन्स्ट्रक्शन यांना ब्लॅकलिस्टमधुन वगळण्यात यावे. स.सदस्य श्री.आगा खान यांचे वार्डातील रस्ता रूंदिकरणातील वॉटर,ड्रेनेज लाईनचे काम बंद आहे. खुलासा करण्यात यावा. |
| शहर अभियंता | :ड्रेनेज लाईनचे काम सुरू असल्याने रोडचे काम बंद ठेवण्यात आले होते. लवकरच रोडचे काम सुरू करण्यात येईल. |
| श्री.आगा खान मिया खान | :वॉटर सप्लायच्या कामासाठी अजुनपर्यंत खड्डेच खोदण्यात आलेले नाही. |
| शाखा अभियंता (श्री.संधा) | :त्याचे वार्डातील दोन कामे मंजूर झालेली आहेत. निवीदा काढुन दोन महिणे झालेले आहेत. |
| मा.सभापती | :काम सुरू करण्यात यावे. |
| श्री.आगा खान मिया खान | :किती दिवसात काम सुरू होईल. |
| शाखा अभियंता (श्री.संधा) | :15 ते 20 दिवस काम सुरू करण्यासाठी लागतील. |
| मा.सभापती | :काम सुरू करण्यात यावे. जोपर्यंत वॉटर सप्लायचे काम होत नाही तो पर्यंत रस्ता रूंदिकरणाचे काम सुरू करण्यात येवु नये. तसेच स.सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. त्यानुसार तसेच बजेटचे विमोचन झालेले नव्हते. वर्तमानपत्रामध्ये बजेटसंदर्भात ज्या बातम्या आलेल्या आहेत त्या कशा रितीने आल्यात. बजेटच्या बाबतीत प्रशासनास विनंती आहे की, शासनाकडुन अनुदान आणण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. आऊटसोर्सींग ऑफ टॅक्सेशन हा प्रयत्न केला पाहिजे. वसुली कशा रितीने वाढली पाहिजे याबाबतीत प्रशासनास वारंवार सभागृहातर्फे सांगीतले जाते परंतु त्याचे प्रशासनाकडुन कार्यान्वित केले जात नाही. काही करार केलेले आहेत त्यामुळे विकास कामांवर परिणाम होत आहे. सर्व सदस्यांच्या मताप्रमाणे कुठलाही सदस्य विकास कामांमध्ये तडजोड करणार नाही. अर्थसंकल्पातील विकास कामे रद्द न करता ते करण्यात यावे. नागरीकांना वेठीस धरायचे नाही. यासाठी प्रशासनाने गंभिरतेने विचार करावा |
| श्री.गिरजाराम हळनोर | :अमरप्रित ते दर्गारोड येथील लाईटबाबत वर्तमानपत्रात नेहमी बातमी येत आहे. परंतु तेथील लाईट बंद अवस्थेत आहे. ते चालू कुणी करायचे त्याचे मेंन्टनन्स कुणी करायचे. एमएसआरडीसीने रस्ता तयार केला आहे तो केव्हा हस्तांतर करणार आहे. त्या भागातील माजी आमदार श्री.श्रीकांत जोशी यांनी वारंवार प्रशासनाशी संपर्क साधुन काम करण्यासंदर्भात सांगीतले आहे तरीही काम होत नाही. |

**श्री.बाळासाहेब मुंडे** :हनुमाननगर ते जयभवानी नगर येथील विद्युत पोलवरील लाईट बंद आहेत ते सुरू करण्यात यावे.

**मा.सभापती** :अमरप्रित ते दर्गारोड येथील लाईट मेंन्टनन्स करण्याची जबाबदारी आपली आहे.

**उपअभियंता(विद्युत)** : अमरप्रित ते दर्गारोड हा एमएसआरडीसीने हस्तांतर केलेला नाही. याबाबत प्रशासनाने वारंवार पत्र व्यवहार केलेला आहे. महाजन ठेकेदाराला लाईट सुरू करण्याबाबत कार्यवाही सुरू केलेली आहे. एक आठवडयात लाईट सुरू करुन महापालिकेला हस्तांतर करणार आहे.

**मा.सभापती** :प्रशासनाने स्वत:हुन कार्यवाही का ? सुरू करत नाही.

**कार्य.अभियंता(विद्युत)** : एमएसआरडीसीने सर्व काम करून हस्तांतर करायला पाहिजे कारण अर्धवट काम करून हस्तांतर केल्यास त्याचे मेंन्टनन्स आपल्याला करावे लागेल. बीड हायवे येथील कामही तसेच आहे. याबाबतीत संबधीत विभागाशी वारंवार पत्रव्यवहार केलेला आहे. त्यांनी काम केले नाही तर महापालिकेला पैसे खर्च करावे लागणार आहे.

**मा.सभापती** :किती वर्ष झालेले आहे. काम आपल्याला करावे लागणार आहे.

**कार्य.अभियंता(विद्युत)** :दर्गा रोडसाठी एक आठवडा दिलेला आहे तसेच बीड हायवेसाठी 15 दिवसांचा अवधी दिलेला आहे त्यांनी काम केले नाही तर रिस्क ॲण्ड कॉस्टवर काम करून त्यांचेकडुन रक्कम वसुल करणार आहे. त्यात अडचणी येतील.

**मा.सभापती** :अमरप्रित ते दर्गारोड, बीड हायवे येथील विद्युत पोलवरील लाईट सुरू करण्यात यावे. तसेच हनुमाननगर ते जयभवानी नगर येथील विद्युत पोलवरील लाईट बंद आहेत ते सुरू करण्यात यावे. प्रशासनाने जे टार्गेट दिलेले आहे ते ॲचिव्ह करण्यात यावे अजुनपर्यंत नागरीकांपर्यंत टॅक्सपावत्या पोहचलेल्या नाहीत. महापालिका मोठी यंत्रणा असुन वर्षातुन एक डिमांड देण्यात येत नाही. हि खेदाची बाब आहे. इतर विभागाची डिमांड महिण्याला येते. प्रशासनाने याबाबतीत गांभिर्याने पाहिले पाहिजे. शहरातील विकास कामे झाले पाहिजे. नागरीकांची कामे झाली पाहिजे त्यांना वेठीस धरता कामा नये.

**याच बरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगीताने सभा संपल्याचे घोषित केले.**

**नगर सचिव,**
**महानगरपालिका औरंगाबाद**